# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


**तात्काळ**

क्रमांक विकाअ/शिक्षण/एआरसी/२०१६/287

दिनांक :- 28 JAN 2016

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व खाजगी विनाअनुदानित,

पदवीका/पदवी/पदव्युत्तर पदवी संस्था.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील खाजगी विनाअनुदानित कायम विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्तीची रक्कमे करीता ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत वाढ देणेबाबत.**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १५/तंशिस/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन म.वा./२०१६/२४९ दि. २५ जानेवारी २०१६.

२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ऑनलाईन/२०१५-१६/२१८/३२२३ दि. २२ डिसेंबर २०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थामधील ज्या अभ्यासक्रमाचे शुल्क हे **"शिक्षण शुल्क समितीव्दारे"** ठरविण्यात येते अशा संस्थामधील केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील (ईबीसी) विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपुर्ती योजनेची अमलबजावणी करण्याकरीता (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर माहीती भरण्याकरीता मार्गदर्शक सुचना या कार्यालयाचे संदर्भ पत्र २ अन्वये आपणास देण्यात आलेल्या आहेत व ऑनलाईन फॉर्म भरण्याची मुदत दिनांक १५ जानेवारी २०१६ पर्यंत देण्यात आलेली होती. परंतु विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यास अडचणी निर्माण होत असल्याने ही बाब विचारात घेऊन विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरण्यास दिनांक ५ फेब्रुवारी २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर मुदतवाढ अंतिम असुन यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची संस्थापमुखांनी नोंद घेण्यात यावी.

याबाबत आवश्यक कार्यवाही आपल्या स्तरावरुन करुन सर्व कागदपत्रासह अर्ज दिनांक ८ फेब्रुवारी २०१६ पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.